राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या
**<u>सदस्यांमध्ये बदल करणेबाबत</u>**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः राररसे-२०१५/प्र.क्र.५३८/आरोग्य-५,

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, कॉम्प्लेक्स बिल्डींग,
८ व १० वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई.
तारीखः १६ ऑगस्ट,२०१९.

**<u>वाचा :</u>**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.रारसे-२०१५/प्र.क्र.५३८/आ-५, दि.२० सप्टेंबर,२०१६.
२) राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई या परिषदेच्या दि. १५ एप्रिल,२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या ४० व्या बैठकीचे इतिवृत्त.

**<u>प्रस्तावना :</u>**

देशात कार्यरत असलेल्या विविध रक्तपेढया व रक्त संक्रमण व्यवस्थेतील त्रुटी व कमतरता निर्देशित करुन रक्तपेढी यंत्रणेमध्ये गैरव्यवहार, त्रुटी व कमतरता नष्ट करण्यासाठी निश्चित कालबध्द कार्यक्रम अंमलात आणणे व हा कार्यक्रम न्यायालयासमोर सादर करण्याचे आदेश केंद्र शासन, राज्य शासन व केंद्रशासित प्रदेश यांना देण्याबाबत सन १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात एक सार्वजनिक हिताची जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरुन राज्य शासनाने दि. २ जुलै, १९९६ रोजीच्या शासन निर्णयान्वये “राज्य रक्त संक्रमण परिषद” या स्वायत्त संस्थेची निर्मिती केली आहे. या संस्थेचा मूळ उद्देश राज्यात सुरक्षित रक्ताचा मुबलक पुरवठा वाजवी किंमतीत व्हावा हा आहे.

राज्य रक्त संक्रमण परिषद नियामक मंडळाच्या दि.१४.०९.२०११ रोजी झालेल्या बैठकीत राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या कामकाजात सुसूत्रता आणण्याच्या दृष्टिने सद्यस्थितीत मा.प्रधान सचिव (आरोग्य) हे अध्यक्ष म्हणून राज्य रक्त संक्रमण परिषदेचे कामकाज हाताळत आहेततसेच दि.१५.०४.२०१९ रोजी झालेल्या ४० व्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये खालील बाबींवर अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

अ) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान यांना राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळाचे “सदस्य” म्हणून नियुक्त करण्याबाबत निर्णय

ब) शासन निर्णय दि.२०.०९.२०१६ मध्ये अ.क्र.१४ वरील "प्रतिनिधी, उद्योग संक्रमण चिकित्सा यांच्या ऐवजी ३०० खाटांपेक्षा जास्त असलेले अशासकीय रुग्णालय व त्यास संलग्न रक्तपेढीची प्रतिनिधी "सदस्य" म्हणून समावेश करण्यात यावा.उपरोक्त बाब लक्षात घेता राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या सदस्यांमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या सदस्यांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यास तसेच सदरच्या नियामक मंडळामध्ये अध्यक्षासहित एकूण सदस्यांची संख्या ही १७ अधिक १ विशेष आमंत्रित एवढी मर्यादीत ठेवण्याच्या अटीवर शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य | - | अध्यक्ष |
| २) अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | - | सह अध्यक्ष |
| ३) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव (वित्त) | - | सदस्य |
| ४) आयुक्त अन्न व औषधी प्रशासन, मुंबई | - | सदस्य |
| ५) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान | - | सदस्य |
| ६) संचालक आरोग्य सेवा, मुंबई | - | सदस्य |
| ७) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एडस नियंण संस्था मुंबई | - | सदस्य |
| ८) प्रकल्प संचालक, मुंबई जिल्हे एडस नियंत्रण संस्था मुंबई | - | सदस्य |
| ९) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई | - | सदस्य |
| १०) उप नियंत्रक (औषधे), पश्चिम क्षेत्र भारत सरकार | - | सदस्य |
| ११) प्राध्यापक, संक्रमण चिकित्सा,टाटा रुग्णालय, मुंबई | - | सदस्य |
| १२) प्राध्यापक, संक्रमण चिकित्सा, के.ई.एम. रुग्णालय, मुंबई | - | सदस्य |
| १३) प्रतिनिधी, इंडियन मेडिकल असोसिएशन, मुंबई | - | सदस्य |
| १४) प्रतिनिधी,स्वयंसेवी रक्तदाता संघटना | - | सदस्य |
| १५) ३०० खाटांपेक्षा जास्त असलेले अशासकीय रुग्णालय व त्यास संलग्न रक्तपेढीची प्रतिनिधी | - | सदस्य |
| १६) प्रतिनिधी, महाराष्ट्र रेडक्रॉस संस्था, मुंबई | - | सदस्य |
| १७) संचालक, जनकल्याण ब्लड बँक,पुणे | - | सदस्य |
| १८) डॉ.विंकी रुघवानी, अध्यक्ष थॅलेसिमिया सोसायटी, नागपूर | - | सदस्य |

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१६१५०९१६९६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e32592d7ee16b3f0ea3e5db304272db056899514ece7f762990f9b1a0c5049, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2e35734ec976bf5657815fb42c4d25b0b3c23b4c69600638f3deb172ac9e37f4, ou=PHD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN VASANTRAO WAHUL
Date: 2019.08.16 16:52:03 +05'30'

**( किरण वाहूल )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे, मुंबई.
५. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, वडाळा, मुंबई.
७. प्रकल्प संचालक, मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण सोसायटी, वडाळा, मुंबई.
८. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, रविंद्र ॲनेक्स, चर्चगेट, मुंबई.
१०. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. उप नियंत्रक (औषधे), पश्चिम क्षेत्र, भारत सरकार, मुंबई.
१४. प्राध्यापक, संक्रमण चिकित्सा विभाग, टाटा मेमोरिअल रुग्णालय, मुंबई.
१५. प्राध्यापक, संक्रमण चिकित्सा विभाग, के.ई.एस. रुग्णालय, मुंबई.
१६. प्रतिनिधी, इंडियन मेडिकल असोसिएशन, मुंबई.
१७. प्रतिनिधी, स्वयंसेवी रक्तदाता संघटन.
१८. प्रतिनिधी, महाराष्ट्र रेड क्रॉस संस्था, मुंबई.
१९. प्रतिनिधी, संचालक, जनकल्याण ब्लड बँक, पुणे .
२०. डॉ.विंकी रुघवानी, अध्यक्ष, थॅलेसिमिया सोसायटी, नागपूर.

२१. निवडनस्ती (आरोग्य-५)

(* अनुक्रमांक १३ ते २१ येथे नमूद प्रती राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत रवाना कराव्यात.)

**शासन शुध्दीपत्रक**
**राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या**
**सदस्यांमध्ये बदल करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राससे-२०१५/प्र.क्र.५३८/आ-५,**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, ८ व १० मजला, नवीन मंत्रालय,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा :</u> १) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक:- राससे-२०१५/प्र.क्र.५३८/आ-५ दि.२० सप्टेंबर,२०१६
२) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक:- राससे-२०१५/प्र.क्र.५३८/आ-५ दि.१६ ऑगस्ट,२०१९

**<u>शासन शुध्दीपत्रक :</u>**

वरील वाचा येथील शासन निर्णय क्रमांक:- राससे-२०१५/प्र.क्र.५३८/आ-५ दि.१६ ऑगस्ट,२०१९मध्ये अ.क्र. (६) वरील संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांच्या नावासमोर सदस्य ऐवजी सदस्य- सचिव वाचण्यात यावे व अ.क्र. (१८) वरील विंकी रुघवानी, अध्यक्ष थॅलेसिमिया सोसायटी, नागपूर यांच्या नावासमोर सदस्य ऐवजी विशेष आमंत्रित असे वाचण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३०१११५१४०५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**( किरण वाहुळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई
२. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई

३. प्रधान सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन , वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे, मुंबई
५. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी,वडाळा,मुंबई
७. प्रकल्प संचालक, मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण सोसायटी,वडाळा,मुंबई
८. संचालक, आरोग्य सेवा,आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, रविंद्र ॲनेक्स, चर्चगेट,मुंबई.
१०.मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
११.मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१२.मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१३.उप नियंत्रक (औषधे), पश्चिम क्षेत्र, भारत सरकार,मुंबई
१४.प्राध्यापक, संक्रमण चिकित्सा विभाग, टाटा मेमोरिअल रुग्णालय,मुंबई.
१५.प्राध्यापक, संक्रमण चिकित्सा विभाग, के.ई.एस.रुग्णालय,मुंबई
१६.प्रतिनिधी,इंडियन मेडिकल असोसिएशन,मुंबई,
१७.प्रतिनिधी,स्वयंसेवी रक्तदाता संघटन,
१८. प्रतिनिधी, महाराष्ट्र रेड क्रॉस संस्था, मुंबई,
१९.प्रतिनिधी, संचालक,जनकल्याण ब्लड बँक, पुणे
२०.डॉ.विंकी रुघवानी, अध्यक्ष, थॅलेसिमिया सोसायटी, नागपूर
२१.निवडनस्ती (आ-५)

(अनुक्रमांक १३ ते २२ येथे नमूद प्रती राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत रवाना कराव्यात)